गुरूवार
१९
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ६८
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !









# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स


आजचे सोन्याचे भाव

22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 43, 000/-
20 कॅरेट मणी = 1, 30, 005/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 16, 995/-
16 कॅरेट मुरणी = 1, 04, 000/-

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777









# वडगावपान येथे शाळकरी विद्यार्थीनीवर ॲसिड हल्ला - आरोपी फरार

## सर्वत्र संताप, विधीमंडळात आवाज, ग्रामस्थांचा रस्ता रोको





छाया - गोविंद गोसावी, संगमनेर

## ना. विखे, आ. खताळ यांनी विधीमंडळात उठवला आवाज

शालेय विद्यार्थीनीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर असून पोलीसांना याबाबत तपासाच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहीती जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. वडगावपान येथे शालेय विद्यार्थ्यानीवर ॲसिड फेकल्याच्या घटनेची दखल घेवून पालकमंत्री विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण रूग्णालयात विद्यार्थीनीला सर्वतोपरी उपचार करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस उपअधिक्षक कुणाल सोनवणे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने तपास करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत. सदर विद्यार्थीनी आपल्या नातेवाईकांकडे राहात होती. घटना ज्या भागात घडली तिथे सीसीटिव्ही कोणतीच व्यवस्था नाही. तरीही पोलीसांनी विशेष पथक नेमून आरोपीचा तपास करावा असे निर्देश आपण दिले असून शासनाच्यावतीने विद्यादर्थीनीला मदत मिळवून देण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. दरम्यान आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत या घटनेचा विषय उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले.यावर महीला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी घटनेची माहीती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून घेतली असून या विद्यार्थीनीला सर्व मदत करण्याची ग्वाही सभागृहात दिली.



## माजी मंत्री थोरात, वडेट्टीवार, आ. तांबे यांच्याकडून निषेध

वडगावपान येथील तेरा वर्षीय मुलीवर झालेल्या ॲसिड हल्ल्याच्या घटनेचा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला असून, हा प्रकार अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. सुधीर तांबे यांनी या घटनेनंतर तातडीने रुग्णालयात जाऊन जखमी मुलीची भेट घेत तिच्या कुटुंबीयांना धीर दिला. त्यांनी पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून आरोपीला त्वरित अटक करण्याची मागणी केली. आ. सत्यजीत तांबे यांनीही या घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली. महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांच्या परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा मजबूत करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी या घटनेला अत्यंत निंदनीय ठरवत, गुन्हेगार कोणत्याही जाती-धर्माचा नसून तो केवळ गुन्हेगारच असतो, असे ठामपणे सांगितले. राज्यात महिला आणि लहान बालिकांवरील अत्याचार थांबण्याचे नाव घेत नसून, संगमनेरमध्ये सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या एका चिमुरडीवर झालेला सिड हल्ला हा अत्यंत संतापजनक आहे. राज्यात पोलिसांचा धाक उरला आहे का? असा संतप्त सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज सभागृहात उपस्थित केला. वडेट्टीवार यांनी शालेय विद्यार्थिनीवर झालेल्या घटनेचे गांभीर्य आणि पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत तातडीने चर्चा करण्याची मागणी केली.

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - तालुक्यातील वडगावपान येथे मंगळवारी सकाळी घडलेल्या अमानुष ॲसिड हल्ल्याच्या घटनेने संगमनेरसह राज्य हादरले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. डी.के. मोरे जनता माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीतील १३ वर्षीय विद्यार्थिनी कु. ईश्वरी संजय डहाळे हिच्यावर अज्ञात तरुणाने ॲसिड फेकून भ्याड हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वरी ही मूळची धांदरफळ येथील रहिवासी असून वडिलांच्या निधनानंतर ती आपल्या आईसह वडगावपान येथे मामाकडे राहत होती. मंगळवारी सकाळी ती नेहमीप्रमाणे शाळेत गेली होती. सकाळी साडेअकराच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर ती घरी जात असताना महादेव मळा परिसरातील सुनसान रस्त्यावर अज्ञात माथेफिरूने या मुलीवर ॲसिड हल्ला केला. या रस्त्यावर वस्ती कमी असल्याने आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव असल्याचा फायदा घेत अज्ञात तरुण दुचाकीवरून आला आणि त्याने अचानक ईश्वरीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले. या हल्ल्यात तिच्या चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या असून वैद्यकीय अहवालानुसार सुमारे ५ ते ६ टक्के भाग भाजला आहे. घटनेनंतर आरोपी तात्काळ पसार झाला. जखमी अवस्थेतील ईश्वरीला तातडीने प्रवरा रुग्णालय लोणी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. तिची प्रकृती स्थिर असली तरी डॉक्टरांकडून योग्य उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. नागरिकांनी संताप व्यक्त करत प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, तसेच पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची सूत्रे हाती घेतली. पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२६/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम १२४(१), १२६(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी दहा विशेष पथके तयार करण्यात आली असून सायबर टीम, फॉरेन्सिक तपास, तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सर्व बाजूंनी कसून तपास सुरू आहे. मात्र सायंकाळपर्यंत आरोपीचा ठावठिकाणा लागलेला नाही.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी ग्रामस्थांनी कोल्हार-घोटी रस्ता येथे रास्ता रोको आंदोलन छेडले. या आंदोलनात शाळकरी मुली, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली. संगमनेर तालुक्यात चालले काय ? असा सवाल करताना आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करताना महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी सरकारने कडक कायदे करावे अशी आग्रही मागणी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केली आहे. लहानग्या चिमुकलीवर झालेला सिड हल्ला हा अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेतील आरोपीला प्रशासनाने तातडीने शोधून कठोर शिक्षा केली पाहिजे. जेणेकरून पुढचा आरोपी असे गुन्हा करणार नाही. परवाच पठार भागातील एका युवतीवर चाकूने हल्ला झाला. काल सिड हल्ला झाला संगमनेर तालुक्यात चालले काय असा संतप्त सवाल त्यांनी केला.

तर डॉ.मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, संगमनेर शहरामध्ये महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी रक्षक दल निर्माण केले आहे त्याच पद्धतीने आपल्याला ग्रामीण भागामध्ये सुद्धा गावांमध्ये महिलांच्या सुरक्षेतेसाठी रक्षक दल निर्माण करावी लागतील. तर शिवसेनेच्या सौ. निलम खताळ यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करत पोलीसांनी आरोपीचा तात्काळ शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करावी. या प्रकरणी आ. अमोल खताळ देखील विधान सभेत आवाज उठवत असून पिडीत मुलीला सर्वोतोपरी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे सांगितले.

यावेळी सौ.दुर्गाताई तांबे, बाबा ओहोळ, बाळासाहेब गायकवाड, पद्माताई थोरात, विक्रम ओहोळ, निलेश थोरात, शरद नाना थोरात, अर्जुन काशीद, सरपंच श्रीनाथ थोरात, रूपाली थोरात, अरुण कुळधरण, अहिल्या ओहोळ, सविता ओहोळ, बाळासाहेब गडगे, गणेश गडगे, रवींद्र मैड, सुधीर थोरात, आबासाहेब थोरात, भाग्यश्री शिरसाट, आनंद वर्पे, रावसाहेब जंबुकर यांच्यासह संगमनेर तालुक्यातील विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते व वडगाव पान मधील ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. जयश्री थोरात, सौ. निलमताई खताळ, छोट्या मुलींच्या हस्ते तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी निवेदन स्वीकारले. याचबरोबर आरोपीचा लवकरात लवकर शोध लावण्यासाठी पोलीस प्रशासन काम करत असल्याचे ते म्हणाले यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

**१३ वर्षीय विद्यार्थिनीवर झालेल्या सिड हल्ल्याचा महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात,मा. आ.डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवरांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. याचबरोबर घटना घडल्यानंतर डॉ.जयश्रीताई थोरात व मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी प्रवरा हॉस्पिटलमध्ये जाऊन मुलीची चौकशी केली. याचबरोबर नातेवाईकांना धीर दिला या मुलीच्या दवाखान्याचा उपचाराचा सर्व खर्च एसएमबीटी संस्था करणार असून अत्याधुनिक टेक्नॉलॉजी द्वारे सर्जरी किंवा डोळ्याच्या आरोग्याबाबत डॉ.जयश्रीताई थोरात यांनी मुंबई येथील प्रतीथयश डॉ. रानडे विविध डॉक्टरांशी संपर्क केला आहे. या भ्याड हल्ल्याचा संगमनेर तालुक्यातून सर्व क्षेत्रातून तीव्र निषेध व्यक्त होत आहे.**

विशेष म्हणजे, संगमनेर तालुक्यात गेल्या काही दिवसांत महिला व मुलींवरील अत्याचारांच्या घटना सातत्याने घडत आहेत. रणखांब येथे दोन दिवसांपूर्वी एकतर्फी प्रेमातून तरुणीवर धारदार शस्त्राने हल्ला झाला होता, तर काही दिवसांपूर्वी एका शिक्षकाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली होती. या सलग घटनांमुळे तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

संगमनेर तालुका महिलांसाठी असुरक्षित होत चालला आहे का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. अवैध धंदे, अमली पदार्थांचा वाढता प्रभाव आणि वाढती गुन्हेगारी यामुळे सामाजिक अस्वस्थता निर्माण झाली आहे. समाजातील प्रत्येक मुलगी ही घराची लक्ष्मी असून तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे. अशा अमानुष कृत्यांना आळा घालण्यासाठी आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देणे अत्यावश्यक आहे. या घटनेतील पीडित मुलीला लवकरात लवकर न्याय मिळावा आणि आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून जोर धरत आहे.










# राज्यातील कालबाह्य कायदे रद्द, विधेयक मंजूर



मुंबई
(प्रतिनिधी)-
महाराष्ट्रातील कालबाह्य झालेले ८० अधिनियम आणि कायदे रद्द करणारे विधेयक मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले असून, सुशासन व सुलभ प्रशासकीय कामकाजासाठी हे कायदे रद्द करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्यातील विवक्षित अधिनियमांचे निरसन करण्यासाठीचे विधेयक विधानसभेत सामान्य प्रशासन विभागाचे अँड. आशिष शेलार यांनी मांडले. चर्चेअंती हे विधेयक मंजूर करण्यात आले.

याबाबत शासनाची भूमिका मांडताना, मंत्री शेलार यांनी सांगितले की, संवैधानिक बदल, राज्याची पुनर्रचना आणि नवीन कायद्यांची अधिनियमिती यामुळे महाराष्ट्रातील अनेक अधिनियम कालबाह्य झाले आहेत. त्यांचे संदर्भ टिकून राहिल्यामुळे संदिग्धता निर्माण होत आहे. म्हणून, राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात अमलात असलेल्या सर्व राज्य कायद्यांचे परीक्षण करण्याचे काम हाती घेतले आहे आणि जे वापरात नाहीत असे मुंबई अधिनियम, मुंबई विनियम, बंगाल विनियम, मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, हैद्राबाद अधिनियम आणि मध्य प्रदेश अधिनियम निरसित करण्याचे ठरविले आहे.

रद्द केलेले कायदे / अधिनियम

मुंबई अधिनियम २४, मध्य प्रांत वऱ्हाड अधिनियम ८, हैदराबाद अधिनियम १८ आणि मध्य प्रदेश ३ यांसह विनियोग अधिनियम २४, अशा एकूण ८० अधिनियमांचा यामध्ये समावेश आहे. बंगाल जलोढ व गाळ विनियमन १८२५, ऋण व्याज गहाण अभिसिकृती विनियमन १८२७, भडोच व खेडा यातील भार असलेल्या भूसंपत्तीबाबत अधिनियम १८७७, मुंबई अबकारी अधिनियम १८७८, बोस्टल शाळा अधिनियम १९२९, महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम, मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम १९३९, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम १९४२, मुंबईचा फटक्याची शिक्षा रद्द करण्याबाबत अधिनियम १९५७, अशा विविध कालबाह्य अधिनियमांचा यामध्ये समावेश आहे.

# राज्यातील धरणांमध्ये ५८% उपयुक्त पाणीसाठा - इंजि. चकोर

**अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)–**
राज्यात लहान, मध्यम व मोठे एकूण एकत्रित सुमारे ३०११ इतकी धरणे असून, यावर्षीच्या १७ मार्च २०२६ अखेर या सर्व धरणांमध्ये सुमारे ५८.५६% टक्के (८४१.६७५ टी.एम.सी. टीएमसी) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जल सिंचन तज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

त्याचबरोबर, गतवर्षी १७ मार्च २०२५ रोजी राज्यातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा हा फक्त ५१.८७% म्हणजेच ७४५.५२० टीएमसी इतकाच होता, मात्र यावर्षी सुमारे ७% टक्के इतका उपयुक्त पाणीसाठा जास्त आहे. पुढे बोलताना, श्री. चकोर यांनी सांगितले की, राज्यात सहा महसुली विभाग असून, १७ मार्च २०२६ रोजी उपयुक्त पाणी साठ्याची स्थिती खालील प्रमाणे आहे.



कोकण विभागात एकूण १७३ धरणे असून, त्यांमध्ये आजमीतीस सुमारे ७४.१६४ टी.एम.सी. (५६.६८%) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. नाशिक विभागात ५३८ इतकी लहान, मध्यम व मोठी धरणे असून, त्यामध्ये आजमितीस १२२.२९३ टीएमसी (५८.१७%) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. पुणे विभागात एकूण ७२२ धरणे असून, त्यामध्ये ३०४.५४० टीएमसी (५६.५८%) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाडा विभागामध्ये एकूण ९२२ धरणे असून, त्यामध्ये आज सुमारे १५८.७७३ टीएमसी (६१.८७%) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. अमरावती विभागामध्ये २७१ धरणे असून, त्यामध्ये ८३.९७२ टीएमसी (६१.२१%) आणि नागपूर विभागात ३८५ धरणे असून, या धरणांमध्ये ९७.९३३ टीएमसी (५९.६५%) टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

सर्वात जास्त पाणीसाठा हा (मराठवाडा) विभागात (८४.८३%) आणि त्या खालोखाल अमरावती विभागात (६१.२१%) असून, सर्वात कमी पाणीसाठा पुणे विभागात (५६.५८%) असल्याचे दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, राज्यातील प्रमुख मोठ्या तीन धरणांमध्ये दि. १७ मार्च २०२६ रोजी शिल्लक असलेला उपयुक्त पाणीसाठा खालील प्रमाणे आहे. उजनी धरण ३१.०० टी.एम.सी. (५७.८७%), कोयना -- ६१.६९३ टी.एम.सी. (६१.६१%) आणि जायकवाडी - ५१.८३० टी.एम.सी. (६७.१२%) असा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख असलेल्या भंडारदरा धरणात एकुण सुमारें ७.५८५ टीएमसी (७१.१८%), निळवंडे धरणात ४.१५७ टीएमसी (४९.९६%), मुळा धरणात १८.०२५ टी.एम.सी. (६९.३३%), आढळा धरण -- ०.७४१ टी.एम.सी. (६९.९१%)* तसेच भोजापुर - ४८ दघफुट (१३.३०%) इतका एकूण एकत्रित पाणीसाठा शिल्लक असल्याची. अशी माहिती इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी दिली.

# समर्पण ग्रामोन्नती बहुदेशीय संस्थेचे कार्य उल्लेखनीय - डॉ. मायकल मार्टिन



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
सामाजिक बांधिलकी ठेऊन, शिक्षण, आरोग्य क्षेत्रामध्ये सामाजिक जागृती करून प्रसार, प्रचार करत असलेल्या समर्पण ग्रामोन्नती संस्थेचे कार्य उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन प्रशिक्षक डॉ. मायकल मार्टिन यांनी केले. भंडारदरा पांजरे बेट शिखर कॅम्पिंग येथे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

डॉ. मार्टिन यांनी म्हटले की, संस्था उभी करणं खूप सोपे असते, परंतु ती टिकवणे ही कठीण असते. संस्थेचे ध्येय गाठण्यासाठी विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये जागृती केल्यास सामाजिक बदल घडविण्यास मदत होईल. संस्थेच्या भविष्यातील वाटचाली संदर्भात, संस्थेचे अध्यक्ष भास्कर येलमामे यांनी मार्गदर्शन करून भंडारदरा परिसरातील इतिहासाबद्दल पूरक माहिती दिली, तर वन अधिकारी शंकर लांडे यांनी नैसर्गिक साधन संपत्ती व वन्यविषयसंदर्भात माहिती देऊन सायंकाळचे सूर्यास्त दर्शन घडविले.

या कार्यशाळेत, संस्थेच्या उपाध्यक्षा शैलजा साबळे, सचिव अनिल भोसले, खजिनदार बाबासाहेब कदम, उपसचिव सुनील सोनार, अविनाश काळे, संजय साळवे, स्नेहल जाधव, रमेश हिले, विकास निर्मल, पंकज तकते, गिरीधर बोडके, यशवंत घीरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी अनिल भोसले यांनी सर्वांचे आभार मानले.

# आदिवासी भागात सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीनचे वाटप



राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील साकीरवाडी, आंभोळ व कळंब येथील विद्यालयामध्ये किशोरवयीन मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी स्वच्छता व आरोग्य विषयक जागरूकता निर्माण होण्याच्या दृष्टीने स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम डिसेंट फाउंडेशन, पुणे तसेच एल. आय. सी. पेन्शन फंड प्रा. लि. यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.

या सोबतच, सर्व मुलींना कळी उमलताना या मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा सदर शाळांतील एकुण २५० किशोरवयीन मुलींना आरोग्याच्या दृष्टीने निश्चितच फायदा होणार आहे. या कार्यक्रमात तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य, मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता तसेच स्वसंरक्षण या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन तसेच स्वच्छता व आरोग्याबाबत जागरूकतेची भावना निर्माण झाली.

तसेच, संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी माहिती दिली. यावेळी डिसेंट फाउंडेशन चे संस्थापक मा. जितेंद्र बिडवई, संचालक आदिनाथ चव्हाण, परिचारिका श्रीमती उज्वला गवळी, छाया पाटील उपस्थित होते. तसेच संबंधित शाळांच्या वतीने मुख्याध्यापक मंगेश रत्नाकर, ज्ञानेश्वर जेडगुले, श्याम मालुंजजकर तसेच सहशिक्षक बाळासाहेब घिगे, शशिकांत नागरे, ललिता मुतडक, जालिंदर साळुंखे, संतू जेडगुले, बाळू जाधव व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# अकोलेतील ग्राहक मेळाव्यात तक्रारींचा पाढा



अकोले
(प्रतिनिधी)-
येथील तहसील कार्यालय आणि महाराष्ट्र ग्राहक पंचायतच्यावतीने जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी गॅस वितरण, संगमनेरचे पुरवठादार, बाजारतळ, बिबटे, वीज आदी प्रश्नांबाबत नागरिकांनी तक्रारींचा पाढा वाचला. या ग्राहक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे हे होते.

यावेळी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, नायब तहसीलदार प्रमोद सावंत, वीज अभियंता नामदेव शेळके, विठ्ठल सोनवणे, पुरवठा निरीक्षक संदीप निळे, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले आदी उपस्थित होते. तसेच राजूर वन विभागाचे दत्तात्रय पडवळ, अकोलेचे आनंदा पाटील, दिलीप जिरे, दुय्यम निबंधक अतुल कदम, वैध मापन निरीक्षक प्रशांत गडाख, अ. का. आहेर, बस आगाराचे सचिन वाकचौरे, दिलीप जिरे, नगरपंचायतचे कार्यालयीन अधीक्षक योगेश सुकटे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक माधव तिटमे यांनी केले. सूत्रसंचालन पुरवठा लिपीक राम जाधव यांनी केले तर आभार राम रुद्रे यांनी मानले.

# गुढीपाडवा : नवउमेद, नवसंस्कार आणि नवविचार



चैत्र प्रतिपदेला महाराष्ट्रामध्ये गुढीपाडवा म्हणतात. वर्षातील साडेतीन मुहूर्ता पैकी पैकी गुढीपाडवा हा एक मुहूर्त आहे. शालीवाहन शकाची सुरुवात याच दिवसापासून होते. शालिवाहन नावाच्या एका कुंभाराच्या मुलाने मातीचे सैन्य तयार केले, त्यावर पाणी शिंपडले, त्यांना सजीव केले आणि त्यांना हाताशी धरून शत्रूचा पराभव केला. तेव्हापासून शालिवाहन शक सुरू झाला, असे म्हणतात. हे एक लाक्षणिक कथन किंवा कथा आहे. मातीच्या सैन्यावर पाणी शिंपडून त्यांना सजीव करणे अशक्य आहे. परंतु त्याचा अर्थ आपण नीट समजून घेतला पाहिजे.

शालिवाहनाच्या काळात लोक पौरूषहिन, पराक्रम हिन, चैतन्य हीन बनले होते. ते शत्रूला जिंकू शकत नव्हते. त्यामुळे शालिवाहनाला प्रश्न पडला की काय करावे. त्याने प्रत्येक माणसांमध्ये चैतन्य निर्माण केले. 'तू लढू शकतोस, तू जिंकू शकतोस' ही हिंमत निर्माण केली. पौरूषत्व निर्माण केले. त्यांच्यातील पराक्रम जागृत केला आणि शत्रूचा पराभव झाला. आज आपणही भौतिक वादाशी लढायला असमर्थ बनलो आहोत. 'अमृतस्य पुत्राहा' अशी वेदांनी गर्जना केली. मग आपण बिचारा म्हणून राहायचे का? म्हणूनच आज शालिवाहन राजासारखी गरज आहे. हा हिंदू धर्माचा आध्यात्मिक, नैसर्गिक अशा प्रकारचा धार्मिक सण आहे. याच दिवशी प्रभू रामचंद्रांनी वालीच्या तावडीतून प्रजेची सोडवणूक केली होती. त्यावेळेला मुक्त झालेल्या प्रजेने घरोघर गुढ्या उभारल्या. त्याचबरोबर प्रभू रामचंद्र अयोध्येला आल्यावर लोकांनी स्वतःहून आपल्या घरावर गुढ्या उभारल्या. या दिवशीच ब्रह्मदेवाने वेळ आणि विश्वाची निर्मिती केली, म्हणून गुढीला ब्रह्मध्वज असे म्हटले जाते. गुढी हे विजयाचे प्रतीक आहे.

उंच बांबू, रेशमी कापड, कडुलिंबाची पाने, फुलांचा हार, साखरेची माळ, त्याच्यावर तांब्या असे गुढीचे स्वरूप असते. सतयुगाची सुरुवात याच दिवशी झाली, असे मानले जाते. गुढीपाडव्याच्या दिवस निश्चित करण्यापूर्वी प्राचीन भारतीय गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांनी त्यांच्या संशोधनानुसार भारतीय पंचांग रचले. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचे दिवस, महिने व वर्षाची गणना केली. त्यानुसार चैत्र महिना प्रतिपदेचा गुढीपाडव्याचा आहे.

गुढीपाडव्याला आपण नैतिकतेचा, सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा. घरात जी गुढी उभारलेली आहे, ती सत्त्वगुण, चैतन्य, ज्ञानलहरी, सगुण-निर्गुण ब्रह्मतत्त्व निर्माण करणारी आहे. त्या दृष्टीने आपण गुढीकडे बघावे. या दिवशी आपल्या ऋषीमुनींनी कडुनिंबाचे रसपान करावे, असे सांगितले. त्याच्यामागेही काही शास्त्र आहे. लिंब कडू आहे, पण तो आरोग्यदायक आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की जीवनात गोड आणि कडू असे दोन्हीही अनुभव आले पाहिजेत. नुसताच जीवनामध्ये गोड अनुभव जर येत राहिला, तरी जीवन रूक्ष बनेल. म्हणून जीवनामध्ये कडू घोटही पाहिजे. यासाठी तर गुढीपाडव्याचा दिवस निश्चित केला. गुळाच्या खड्याबरोबर कडुलिंबाची पाने खाणे ही प्रथा पडली. माणसाला जीवनामध्ये प्रगतीपथावर जाताना अनेक वेळा कडू किंवा कटू घोट घ्यावे लागतात. गुढीपाडव्याला एक म्हण प्रचलित झाली आहे, ती म्हणजे, गुढीपाडवा, नीट बोल गाढवा. यामध्ये 'गाढव' शब्दात टिंगल-टवाळी नसून थोडीशी आपुलकी आहे आणि माणसाला जगण्याचा भान देणारे गुढीचे महत्त्व सांगणारे तत्त्व आहे.

माणसाचे जीवन किंवा जगणं थोडं गोड, थोडं कडू असं असतं. दिवसभरात आपल्या बोलण्यातही गोडवा कुठे असतो? काही वेळा कटू बोलावं लागतं. कडू चव ही आयुष्यातील महत्त्वाची चव आहे. म्हणूनच आपल्या हिंदू धर्मामध्ये संक्रांतीच्या दिवशीसुद्धा तिळगुळ घ्या, गोड गोड बोला असे म्हटले जाते. गुढीपाडव्याला ही कडुनिंबाचा पाला आणि गूळ, आणि शिवाय वरती 'गाढवा' हा शब्द ऐकावा लागतो, पण त्यामागे चांगली भावना असते.

गुढीची आचारसंहिता आहे. सकाळी स्नान करून प्रसन्न चित्ताने गुढी उभारावी. ती सजवावी. या दिवशी पुढील वेळेपर्यंत, म्हणजेच साधारणपणे दुपारी चार वाजेपर्यंत गुढी बाहेर ठेवावी आणि नंतर तिची आरती करून, पूजा करून गुढी खाली उतरवावी. गुढीला लावलेली साखरेची काठीची माळ आणि लिंबाचा पाला हे कॉम्बिनेशन जबरदस्त आहे. दारामध्ये गुढी उभारली की संपूर्ण घर छान दिसू लागते. म्हणून नवीन पिढीने आपल्या प्रत्येक सणाचा अभ्यास करावा. त्यामागे असलेले शास्त्र समजून घ्यावे आणि सण फक्त करायचा म्हणून करायचा असे करू नये. या सणांमुळेच माणूस एकमेकाला जोडला जातो. यानिमित्ताने मराठी नववर्ष दिन सुरू होते. निरनिराळे विजयाचे संकल्प केले जातात. त्यासाठी हा दिवस अत्यंत उपयोगी आहे. या दिवशी शुभचिंतन, शुभदर्शन, शुभमनन, शुभकथन करावे, अशी अपेक्षा आहे. याचा अर्थ नवीन वर्षाची सुरुवात आपण शुभचिंतने करावी, ही अपेक्षा.

आपल्या हिंदू धर्मातील प्रत्येक सण आपल्याला उत्साह, चैतन्य, पवित्रता, आनंद देतो, जगण्याचे भान देतो, जगण्याची रीत समजावून सांगतो. माणसाने माणसासारखे वागावे, हे शिकवतो. त्यासाठीच माणसाच्या जीवनात प्रगतीपथावर जाण्यासाठी सण आणि उत्सव हे खूप महत्त्वाचे आहेत. फक्त आपण त्याचा अर्थ, त्यामध्ये असणारे शास्त्र हे समजून घेतले पाहिजे. या दिवशी वृक्षांना नवी पालवी फुटते, आंब्याच्या वृक्षांना मोहोर येतो, कोकिळेचे पूजन कानी पडू लागते, सृष्टीला नवीन स्वरूप प्राप्त होते. दिवस हळूहळू मोठा होत जातो. हा वर्षाचा पहिला सण असल्यामुळे सर्वत्र आनंदोत्सव असतो. आपण नेहमी सकारात्मक विचार करावा, म्हणजे आपल्या यशाची गुढी सतत उभी राहील. गुढीपाडव्यानिमित्त हा शब्दप्रपंच.

**प्रा. शशांक गंधे,**
**९८९०१६३६४२**

# आसावरी काकडे यांना भावपूर्ण आदरांजली...



आसावरी काकडे (जन्म : २३ जानेवारी, १९४९) या एक मराठी-हिंदी कवयित्री आणि गद्यलेखक. त्यांनी बी.कॉम. नंतर मराठी आणि तत्त्वज्ञान या दोन विषयांत एम.ए. केले. आसावरी काकडे यांच्या स्वरचित कवितांशिवाय त्यांनी डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिंदी कवितांचा 'तरीही काही बाकी राहील' या नावाचा अनुवाद केला आहे. दीप्ती नवल यांच्या 'लम्हा लम्हा' या हिंदी कवितासंग्रहाचा त्याच नावाचा अनुवाद केला आहे. डॉ. चंद्रप्रकाश देवल यांच्या ऋबोलो माधवी' या हिंदी कवितासंग्रहाचा 'बोल माधवी' या नावाचा अनुवाद केला आहे. 'मेरे हिस्से की यात्रा' हा आसावरी काकडे यांनी स्वतःच्याच निवडक कवितांचा केलेला हिंदी अनुवाद आहे.

आसावरी काकडे यांनी नवी दिल्ली येथील आकाशवाणीतर्फे आयोजित जयपूर येथील सर्वभाषी कविसंमेलन मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. आसावरी काकडे यांच्या कविता महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांच्या ७वी-८वी-११वीच्या विद्यार्थ्यांच्या आणि पुणे-नाशिक येथील विद्यापीठांच्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी त्यांच्या पुस्तकांत समाविष्ट केल्या गेल्या आहेत. गोवा विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात मराठीतील अनुवादित भारतीय साहित्य' या विषयासाठी नेमलेल्या पाठ्यपुस्तकांत बोल माधवी' या कवितासंग्रहाचा समावेश झाला आहे.

आसावरी काकडे यांनी लिहिलेली पुस्तक परीक्षणे, ललित लेख, कथा इ. गद्य साहित्य विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहे. त्यांचा आकाशवाणीवरील, दूरदर्शनच्या व विविध साहित्य संमेलनांच्या कविता विषयक कार्यक्रमात सहभाग असतो. काकडे यांच्या अनेक हिंदी कवितांचा मराठी अनुवाद विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाला आहे.

मौन क्षणों का अनुवाद' या हिंदी कवितासंग्रहातील काही कवितांचा पंजाबी, मैथिली भाषेत अनुवाद व काही मराठी कवितांचा राजस्थानी, हिंदी व इंग्रजी भाषेतील अनुवाद जागती जोत', भाषा', भारतीय कविताएँ', समकालीन भारतीय साहित्य' यात प्रकाशित. पेंग्विन बुक्स द्वारा प्रकाशित नव्या वाटा, नवी वळणे' या डॉ. निशिकांत मिरजकर यांनी संपादित केलेल्या प्रातिनिधिक मराठी कवींच्या कवितासंग्रहात आसावरी काकडे यांच्या पाच कविता आहेत. आसावरी काकडे यांची 'खोद आणखी थोडेसे....' ही 'लाहो' या कवितासंग्रहातील कविता महाराष्ट्र बोर्ड इयत्ता दहावी मराठी प्रथम भाषेच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे.

# संपादकीय...

## उन्हाच्या लाटांमध्येही आरोग्य ठेवा ठाम

राज्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच यंदा सूर्यनारायणाने आपला प्रखर अवतार दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अनेक भागांत उकाड्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली असून महिन्याच्या अखेरीस अनेक शहरांचे तापमान चाळीस अंश सेल्सिअसच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. काही शहरांनी तर चाळीस अंशाचा आकडाही ओलांडला आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाडा भागात उष्णतेचा प्रकोप अधिक जाणवत असून येत्या दिवसांत राज्यातील इतर भागांतही तापमानात लक्षणीय वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पुढील दोन आठवड्यांत राज्यातील बहुतांश शहरांचे तापमान चाळीस अंशांच्या घरात पोहोचेल आणि उकाड्याची तीव्रता वाढेल, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यावर्षी केवळ तापमान वाढणार नाही तर उष्णतेच्या लाटांचाही धोका संभवतो, असा अंदाजही हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. मार्च महिन्यातच उन्हाचा असा दाहक अनुभव येऊ लागल्याने एप्रिल आणि मे महिन्यात परिस्थिती किती कठीण होईल याची कल्पनाच नागरिकांना अस्वस्थ करणारी ठरत आहे. उन्हाळ्याच्या या तीव्र झळा केवळ अस्वस्थता निर्माण करत नाहीत, तर आरोग्यासाठीही मोठे आव्हान ठरतात. त्यामुळे पुढील दोन महिने नागरिकांसाठी खरोखरच कसोटीचे ठरणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. उन्हाळा सुरू झाला की आरोग्याच्या विविध समस्या डोके वर काढू लागतात. प्रखर उष्णतेमुळे शरीरावर होणारा ताण वाढतो. सतत घाम येणे, थकवा जाणवणे, चक्कर येणे, हातपायाला गोळे येणे अशा तक्रारी अनेकांना भेडसावतात. काही प्रकरणांमध्ये उष्माघाताचा धोका निर्माण होतो. उष्माघात ही अत्यंत गंभीर स्थिती असून शरीराचे तापमान अचानक वाढते आणि योग्य वेळी उपचार न मिळाल्यास जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. दरवर्षी उन्हाळ्यात उष्माघातामुळे काही नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर येतात. त्यामुळे या समस्येकडे केवळ ऋतूजन्य त्रास म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. उन्हाळ्यात डोळे, त्वचा, श्वसनसंस्था, हृदय आणि मेंदू यांच्याशी संबंधित आजारांचे प्रमाणही वाढताना दिसते. विशेषतः रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयविकारासारख्या दीर्घकालीन व्याधी असलेल्या व्यक्तींनी या काळात अधिक दक्ष राहणे आवश्यक असते. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि दिवसभर उन्हात काम करणारे मजूर यांच्यासाठी तर हा काळ अधिक संवेदनशील असतो. वाढते तापमान शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी करते आणि त्यामुळे डीहायड्रेशनचा धोका निर्माण होतो. शरीरातील पाण्याची कमतरता वाढली की अशक्तपणा, चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडण्याची शक्यता वाढते. यामुळे उन्हाळ्यात आरोग्य सांभाळण्यासाठी काही साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. सर्वप्रथम शक्यतो दुपारी बारा ते चार या कालावधीत घराबाहेर जाणे टाळावे. अत्यावश्यक काम असल्यासच बाहेर पडावे. बाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा रुमाल, डोळ्यांना गॉगल आणि पायात योग्य पादत्राणे वापरणे आवश्यक आहे. हलके, सैल आणि सच्छिद्र कपडे परिधान केल्यास शरीरातील उष्णता कमी जाणवते. विशेषतः उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी छत्री, टोपी आणि गॉगलचा नियमित वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्याचे योग्य प्रमाण राखणे ही उन्हाळ्यातील सर्वात महत्त्वाची बाब आहे. तापमान वाढले की शरीरातून घामाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर पाणी बाहेर पडते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी वारंवार पाणी पिणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते दररोज किमान दोन ते तीन लिटर पाणी शरीरात जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवण्याची सवय लावणेही तितकेच महत्त्वाचे आहे. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, ताक, लिंबूपाणी, तसेच फळांचे आणि भाज्यांचे रस पिणे शरीरासाठी लाभदायक ठरते. यामुळे शरीराला आवश्यक ऊर्जा मिळते आणि उष्णतेचा परिणाम कमी होतो. यंदा मार्च महिन्यातच उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागल्याने एप्रिल आणि मे महिन्यात उष्णतेचा प्रकोप किती वाढेल याची कल्पना सहज करता येते.

# भूजल संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा -उपजिल्हाधिकारी गिते

## केंद्रीय भूजल विभागाची कार्यशाळा उत्साहात

जिल्हा माहिती अधिकारी-

हवामानातील बदल व भूजलाचा वाढता उपसा लक्षात घेता, जलस्त्रोतांचे संरक्षण व भूजल संवर्धनासाठी शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांनी समन्वयाने पुढाकार घ्यावा. भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी जलस्त्रोतांचे संवर्धन अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले.

केंद्रीय भूजल विभाग (पुणे) यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे मंगळवारी (दि. १७) केंद्रीय भूजल विभागाचे भूजल माहिती भंडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर कार्यशाळेत श्री. गिते बोलत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे, जलसाक्षरता केंद्र (यशदा) चे जिल्हा समन्वयक सुखदेव फुलारी व संतोष दहिफळे उपस्थित होते.

श्री. गिते म्हणाले, भूजल ही मर्यादित व अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून, तिचा वैज्ञानिक व नियोजनबद्ध वापर होणे गरजेचे आहे. सर्व संबंधित विभागांनी केंद्रीय भूजल विभाग आणि भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्या भूजल डेटाबेसचा वापर करून सुसंवादी आणि व्यापक धोरण अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आपली प्रतिक्रिया नोंदवली. प्रभावी भूजल व्यवस्थापनाची गरज अधोरेखित करत, केंद्रीय भूजल विभागाने उपलब्ध करून दिलेल्या या तांत्रिक माहितीचा स्थानिक स्तरावर नियोजन आणि विकासासाठी प्रभावी वापर करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यशाळेत वरिष्ठ भूजलवैज्ञानिक उपेंद्र धोंडे यांनी राष्ट्रीय माहिती प्रसारण धोरण २०१८ वर सादरीकरण केले. तसेच त्यांनी सीजीडब्ल्यूबी डेटा पोर्टल, इंग्रेस, आणि डब्ल्यूआरआयएस प्रणालीचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दिले. माहिती प्रसारणासंदर्भातील सुसंवादाने क्षेत्रीय स्तरावर निर्णय घेण्यास कशी मदत होते, यावर त्यांनी भर दिला.

कनिष्ठ भूजल वैज्ञानिक व्ही. हेमलता यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासाठीच्या राष्ट्रीय एक्विफर मॅपिंग प्रकल्पाचे निष्कर्ष सादर केले. वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे यांनी मार्गदर्शन करताना, जिल्ह्यातील विविध विभागांनी या तांत्रिक संसाधनांचा जिल्हास्तरीय नियोजन व विशेषतः गावातील जलसुरक्षा योजनांच्या तयारीत सक्रियपणे वापर करण्याचा सल्ला दिला आणि त्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शनाची हमी दिली.


या कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा या कॉफी टेबल पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले व उपस्थितांना त्याचे वाटप करण्यात आले. या कार्यशाळेस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा, मृदा व जलसंधारण, लघू सिंचन, वन, कृषी, महिला व बालविकास विभाग यांसह विविध शासकीय विभाग आणि खासगी जल-पर्यावरण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे यांनी केले.

# लारीजानी यांच्या हत्येनंतर इराणचा भीषण पलटवार

## ' तेल अवीव'वर १०० हून अधिक क्षेपणास्त्र हल्ले

तेहरान (वृत्तसंस्था)-

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज (१९ मार्च) वा दिवस आहे. काल (१८ मार्च) झालेल्या इस्त्रायली हल्ल्यात इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी (अली लारीजानी) आणि त्यांचा मुलाचा मृत्यू झाला. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) याला दुजोरा दिला. त्यानंतर आयआरजीसी ने इस्त्रायलची राजधानी तेल अवीवमधील १०० हून अधिक ठिकाणी क्षेपणास्त्र हल्ले केले. लारीजानी, त्यांचा मुलगा आणि बसिज निमलष्करी दलाचे कमांडर गुलामरेझा सोलेमानी यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी हा हल्ला करण्यात आला. इराणने असाही दावा केला आहे की, इस्त्रायलची मजबूत संरक्षण यंत्रणासुद्धा हे हल्ले रोखू शकली नाही. इस्त्रायलच्या म्हणण्यानुसार, क्षेपणास्त्राच्या अवशेषांमुळे एका महिलेचा मृत्यू झाला.



अली लारीजानी (अली लारीजानी) हे इराणचे एक अत्यंत प्रभावशाली नेते, तत्त्वज्ञानी आणि राष्ट्रीय सुरक्षा प्रमुख होते. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या युद्धाच्या पहिल्याच केलेल्या इस्त्रायली आणि अमेरिकेच्या संयुक्त हल्ल्यातील मृत्यूनंतर ते देशातील सर्वात शक्तिशाली व्यक्तींपैकी एक म्हणून उदयास आले होते. इराणच्या राजकीय, लष्करी आणि सुरक्षा यंत्रणांमधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. त्यांच्या मृत्यूमुळे इराणच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. अली लारीजानी यांचा जन्म ३ जून १९५८ रोजी इराकमधील नजफ येथे इराणच्या अमोल शहरातील एका श्रीमंत कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब इतके प्रभावशाली होते की, २००९ मध्ये 'टाईम' मासिकाने त्यांना इराणचे केनेडी (केनेडीज ऑफ इराण) असे संबोधले होते. वडील एक प्रमुख धार्मिक अभ्यासक होते आणि त्यांच्या भावांनीही इराणच्या न्यायपालिकेत आणि इतर महत्त्वाच्या समित्यांवर उच्च पदे भूषवली आहेत.

लारीजानी हे साधारणपणे शांत आणि 'व्यावहारिक' (प्रॅगमॅटिस्ट) नेते मानले जात होते, जे पाश्चात्य देशांशी वाटाघाटी करण्यास तयार असत. मात्र, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांची इस्त्रायलच्या हल्ल्यात हत्या झाल्यानंतर लारीजानी यांची भूमिका अत्यंत आक्रमक झाली. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणचा कारभार पाहणाऱ्या तीन सदस्यीय संक्रमणकालीन परिषदेत (ट्रान्झिशनल कौन्सिल) त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि देशाच्या सुरक्षेची सूत्रे हाती घेतली. त्यांनी अमेरिका आणि इस्त्रायलला गंभीर परिणामांची आणि अमेरिकन सैनिकांना ठार मारण्याची धमकी दिली होती.


# जाहीर नोटीस

तमाम लोकांस जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,संगमनेर नगरपालिका हद्दीत असलेले सर्वे नंबर १६९/९/२ क्षेत्र ०.०१.३२ आर चौ मी असून नमूद ही जागा सध्या शबाना जुबेर शेख रा नाईकवाडपुरा संगमनेर तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर यांचे नावावर असून त्यांना काही घरगुती अडचणीमुळे विकायस काढली असता ती रुबा नाज फैय्याज पठाण रा.हिवरगाव पावसा तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर यांना माहित पडल्यास त्यांनी दिनांक १२.२.२०२६ रोजी विसार पावतीने दस्त क्रमांक २८/२०२६ ने व्यवहार केलेला आहे व १५ ते २० दिवसात खरेदी घेणार आहे तरी हि जागा विकण्याबाबत कुणाचाही कसलाही वाद असल्यास अथवा इतर कसल्याही प्रकारचा कार्यदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर योग्य त्या कागदपत्रासह आमची खात्री करून द्यावी.मुदतीत कुणाचीही कसलीही हरकत न आल्यास त्यांनी त्यांचे हक्क जाणीवपूर्वक सोडुन दिले आहेत असे समजुन शबाना जुबेर शेख यांचे नावे असलेली जागा श्रीमती रुबा नाज फैय्याज पठाण ह्या त्यांच्या नावे करून घेणार आहे,त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक: ११/०३/२०२६**

**जाहीर नोटीस देणार रुबा नाजफैय्याज पठाण राहणार हिवरगाव पावसा तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर,४२२६०५**

READ E- NEWS ON Yuvavarta.in

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ / १२ ते ९
9511238422

पाहिजेत
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१ (ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक)
अकाउंटंट - ०१ (टॅलीचे ज्ञान आवश्यक, किमान ०१ वर्षांचा अनुभव)
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

पाहिजेत
अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- २
टेलिकॉलर (महिला)- ३
हेल्पर - ५
7350628728

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मला, संगमनेर
9921245753

नावात बदल
माझे पूर्वीचे नाव ऋषिकेश बद्दर असे होते ते बदलून नविन नाव ऋषिकेश केदारनाथ बद्दर असे आधार प्रमाणे केले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. करिता आ. क्र. २४१३८००८६५६६
Affidavit No. 2552242021268101228002



# Tender Notice

**"Sangamner Hatmag Vinkar Co-Operative Housing Society Ltd, Sangamner"**
**At.- Padmanagar, Sangamner, Tal.-Sangamner, Dist.- Ahilyanagar.**

Sealed Tender in B-1 Forms are invited from all interested registered and experienced contractor's for the following work.

| Name of the work | Estimated cost | Ernest Money | Time Limit | Cost of Blank Tender form |
|---|---|---|---|---|
| Construction Of Shree Balaji Mandir At.- Padmanagar, Sangamner | 45,50,000.00/- | 45,500.00/- | 6 Months | 3,000.00/- |

Blank tender form are available at the office of B. R. Consultants, Top Ten Imperial, 2nd Floor, Shop No.-S7, Nashik Road, Sangamner-422605. (Mo No.9822310924) from Date. 19/03/2026 to 26/03/2026 at office hours except Saturday and Sunday.

Sealed tender are accepted at the office of B. R. Consultants, Top Ten Imperial, 2nd Floor, Shop No.-S7, Nashik Road, Sangamner-422605., on Date 27/03/2026 up to 05.00PM.

All rights are reserved with management.

**Chairman/Secretary**
Sangamner Hatmag Vinkar Co-Operative Housing Society Ltd, Sangamner.



# जाहीर नोटीस

**आशिर्वाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संगमनेर,** ता. संगमनेर जि. अहिल्यानगर या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना/सभासदांना सुचित करण्यांत येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील **सर्वसाधारण प्रतिनिधीची १ जागा** या प्रवर्गातील संचालक निवडीकरीता मा. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर यांचेकडील दिनांक १७/३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. राजेंद्र सहादु वाकचौरे, सहकार अधिकारी श्रेणी-१ संगमनेर, अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **वार शुक्रवार दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० संस्थेचे कार्यालय,** संगमनेर या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत असुन नैमित्तिकपणे रिक्त झालेले पद निवडीसाठी निवडणुक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे, यांची नोंद घ्यावी. तसेच त्यांनी सदर पदासाठी आवश्यक ती पात्रता धारण केलेली असावी.

**दिनांक - १७/०३/२०२६**
**ठिकाण - संगमनेर**

(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)

मॅनेजर
**आशिर्वाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संगमनेर**
ता. संगमनेर जि. अहिल्यानगर






卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४


वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी


संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥ सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)

मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com




# जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य'



मुंबई
()-
महापालिका, नगरपालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्यां'च्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६' मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये एकूण १ हजार ५ नवीन सदस्यांची भर पडणार आहे.

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक क्षेत्र आणि विविध तांत्रिक विषयांतील तज्ज्ञांचा अनुभव प्रशासनाला मिळावा, या उद्देशाने राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडले होते. विधेयकातील तरतुदींनुसार, जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या एकूण सभासद संख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सभासद (यापैकी जे अधिक असेल ते) नामनिर्देशित केले जातील. त्याचप्रमाणे, पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यामुळे राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमधील २ हजार २१० निर्वाचित सदस्यांच्या जोडीला आता २०१ स्वीकृत सदस्य कार्यरत होतील. तर, ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ सदस्यांच्या संख्येत ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडेल. या नामनिर्देशित सदस्यांना प्रशासकीय कामकाजात सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन देता येईल, मात्र त्यांच्या राजकीय अधिकारांवर काही मर्यादा असतील.

त्यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सभेतील प्रस्तावावर मतदान करता येणार नाही. हे सदस्य अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाहीत. त्यांचा कार्यकाळ संबंधित परिषद किंवा समितीच्या मुदतीबरोबरच संपुष्टात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

निवडीची प्रक्रिया कशी असेल?

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे. हे नामनिर्देशन करताना संबंधित सभागृहातील राजकीय पक्षांचे तौलनिक संख्याबळ आधारभूत मानले जाईल.

त्या-त्या पक्षांच्या नेत्यांशी विचारविनिमय करून, संख्याबळाच्या प्रमाणात या जागांचे वाटप केले जाईल. नियुक्त सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगाद्वारे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

# वडगाव पान येथील ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ मनसे विद्यार्थी सेनेचे निवेदन



संगमनेर
()-
तालुक्यातील वडगाव पान येथे एका अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या सिड हल्ल्याच्या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष घटनेचा तीव्र निषेध करत, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने संगमनेर तालुका पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये संबंधित आरोपीचा तात्काळ शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच, पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी भूमिका मांडण्यात आली.

यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष संकेत लोंढे, शहर अध्यक्ष अभिजीत कुलकर्णी, शहर उपाध्यक्ष सिद्धेश पवार, तालुकाध्यक्ष रोहण गुंजाळ, विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर खैरनार, तसेच महाराष्ट्र सैनिक सतीश पावसे, बजरंग घुले, अविनाश भोर यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपीला लवकरात लवकर अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

# शिक्षण शुल्क माफीच्या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील प्रवेशात मुलींची लक्षणीय वाढ – मंत्री चंद्रकांत पाटील



मुंबई
(वार्ताहर)-
शिक्षण शुल्क माफीच्या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील प्रवेशात मुलींची लक्षणीय वाढ - मंत्री चंद्रकांत पाटील. राज्यातील महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासनाकडून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. उच्च व तंत्र शिक्षणासाठी मुलींचे शिक्षण शुल्क माफ केल्यामुळे सकारात्मक बदल घडून येत असून, मुलींच्या प्रवेशात लक्षणीय वाढ होत आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले.

उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षांसाठी जाहीर करण्यात आलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारांचा वितरण समारंभ एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या सर सिताराम तथा लेडी शांताबाई पारकर दीक्षान्त सभागृहात पार पडला.

कार्यक्रमात शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कार्यकर्त्यांना गौरविण्यात आले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, संचालक (उच्च शिक्षण) डॉ. शैलेश देवळाणकर, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव, कुलसचिव डॉ. विलास नांदेडकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे उपस्थित होते.

राज्यातील नागपूर, अमरावती, उत्तर महाराष्ट्र, कोकण आदी विभागांतून प्रत्येकी एक, अशा एकूण १२ पुरस्कारांचे वितरण यावेळी करण्यात आले. या पुरस्काराची रक्कम एक लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती देत, पुढील काळात ही रक्कम टप्प्याटप्प्याने वाढविण्याचा शासनाचा मानस असल्याचे मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

मंत्री पाटील म्हणाले की, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क दोन वर्षांपासून पूर्णपणे माफ करण्यात येत आहे. यापूर्वी वार्षिक आठ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील मुलींसाठी ५० टक्के शुल्क शासन देत होते. मात्र, आता ती १०० टक्के करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे पहिल्या वर्षी सुमारे २८ हजार आणि यावर्षी तब्बल ५७ हजार मुलींनी व्यावसायिक शिक्षणात प्रवेश घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

# आजातशत्रू, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व : कै. भिकाजी तुकाराम नेहे



सावरगावतळ व संगमनेर परिसरात शांत, प्रामाणिक आणि सर्वांशी आदराने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले कै. भिकाजी तुकाराम नेहे यांचे ११ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या जाण्याने नेहे कुटुंबासह परिसरात एक कर्तव्यनिष्ठ, अजातशत्रू आणि माणुसकी जपणारा आधारस्तंभ हरपला आहे.

कै. भिकाजी नेहे यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. सात भाऊ आणि तीन बहिणी अशा मोठ्या एकत्रित कुटुंबात ते सहाव्या क्रमांकावर होते. घरची परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर बी.कॉम.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. सात भावांमध्ये ते एकटेच उच्चशिक्षित असल्याने आणि बँकेत नोकरी करत असल्याने गावकऱ्यांमध्ये त्यांना आपसूकच भिका साहेब अशी ओळख मिळाली. सावरगाव तळ येथील गावकरी आजही त्यांना आदराने भिका साहेब या नावानेच स्मरतात.

त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत लोकप्रिय आणि सर्वांना आपलेसे वाटणारे होते. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही १९९० साली सावरगाव तळ ग्रामपंचायत निवडणुकीत एका गटाच्या आग्रहास्तव त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या वेळी गावात तीव्र राजकीय स्पर्धा असतानाही दोन्ही गटांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आणि विश्वास होता. निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर त्यांना सरपंचपद देण्याची तयारी होती; मात्र त्यांनी अत्यंत नम्रपणे ती जबाबदारी नाकारली. त्यानंतर त्यांच्यावर उपसरपंच पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि १९९० ते १९९५ या कालावधीत त्यांनी सावरगाव तळचे उपसरपंच म्हणून प्रामाणिकपणे काम केले. त्यानंतर मात्र त्यांनी पुन्हा कधीही कोणतीही निवडणूक लढवली नाही.

कै. नेहे यांचे कुटुंबाबद्दलचे प्रेम आणि नात्यांप्रती असलेली बांधिलकी विशेष होती. १९७७ साली त्यांचा विवाह झाला. बँकेत नोकरी असूनही त्यांनी अनेक वर्षे सावरगाव तळ येथूनच ये-जा करत संयुक्त कुटुंबात राहणे पसंत केले. त्यांच्या आईवर त्यांचा विशेष जीव होता. आई नेहमी त्यांना संगमनेरला राहायला जाण्याचा सल्ला देत असे, परंतु ते आईला म्हणायचे, तू आहेस तोपर्यंत मी संगमनेरला जाणार नाही. १९८५ साली आईचे निधन झाल्यानंतरही त्यांनी काही वर्षे भावांसोबतच राहणे पसंत केले. शेवटी १९८८ साली मुलांच्या शिक्षणासाठी भावांच्या आग्रहास्तव ते संगमनेर येथे स्थायिक झाले.

त्यांचा नोकरीचा प्रवासही अनेक चढ-उतारांनी भरलेला होता. सुरुवातीला त्यांनी शेतकी सहकारी संघात नोकरी केली. त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना लवकरच मॅनेजर पदाची संधी मिळणार होती; मात्र काही कारणास्तव त्यांनी ती नोकरी सोडली. नंतर आदरणीय भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कापूस जिनिंगमध्ये त्यांनी काम सुरू केले. परंतु काही काळातच ती जिनिंग बंद पडली. त्यानंतर अनेक प्रयत्न झाले, परंतु नोकरीच्या काही संधी त्यांच्या हातून निसटत गेल्या. यानंतर त्यांनी नव्याने सुरू झालेल्या श्री बी. जे. खताळ बँकेत नोकरी स्वीकारली. येथे त्यांनी प्रामाणिकपणे काम करत नोव्हेंबर २००८ मध्ये सेवानिवृत्ती घेतली. निवृत्तीनंतर आराम करण्याचा सल्ला मुलांनी दिला होता, मात्र काम हेच जीवन मानणाऱ्या या कर्मयोगी व्यक्तिमत्त्वाला घरी स्वस्थ बसणे मान्य नव्हते. त्यामुळे १० फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी चंदनापुरी येथील मूळगंगा पतसंस्थेत मॅनेजर म्हणून पुन्हा जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या प्रामाणिक कामामुळे संस्थापक आर.बी. शेठ रहाणे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांचा त्यांच्यावर मोठा विश्वास होता.

सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांना मेंदूच्या कर्करोगाचे निदान झाले. तरीही ते पुन्हा कामावर येतील, असा विश्वास त्यांच्या सहकाऱ्यांना होता. संस्थेने त्यांना सहा महिन्यांची वैद्यकीय रजा दिली होती. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. शेवटपर्यंत काम करत राहणारे कै. भिकाजी नेहे अखेर ११ मार्च २०२६ रोजी काळाच्या पडद्याआड गेले. प्रामाणिकपणा, शांत स्वभाव, सर्वांशी प्रेमाने आणि हसतमुखाने बोलण्याची सवय यामुळे ते सर्वांच्या मनात घर करून राहिले होते. अजातशत्रू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाची उणीव नेहे कुटुंबासह मित्रपरिवार आणि समाजाला कायम जाणवत राहील.

कै. भिकाजी तुकाराम नेहे हे केवळ एका कुटुंबाचे आधारस्तंभ नव्हते, तर माणुसकी, कर्तव्यनिष्ठा आणि साधेपणाचे जिवंत उदाहरण होते. त्यांच्या आठवणी आणि त्यांनी दिलेले संस्कार पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी ठरतील.

**शब्दांकन -**
**प्रविण भिकाजी नेहे (मुलगा)**

* स्वर्गवास *
दिनांक. ११/०३/२०२६



ढगे येतात पण पाऊस पडत नाही, आठवणी येतात पण तुमचा चेहरा दिसत नाही,
काय मी बोलु तुम्हाला पुढे गाय मागे वासरू, सांगा बाबा मी तुम्हाला कसे विसरू

## कै. भिकाजी तुकाराम नेहे (साहेब)

यांना

## भावपूर्ण श्रद्धांजली

॥ दशक्रिया विधी ॥
शुक्रवार दि. २०/०३/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा.
ठिकाण - प्रवरातीरी संगम, संगमनेर खुर्द. ता.संगमनेर.

शोकाकुल

गं.भा. सुनिता भिकाजी नेहे (पत्नी)
श्री. अनिल भिकाजी नेहे (मुलगा)
श्री. प्रविण भिकाजी नेहे (मुलगा)
कु. अदिती अनिल नेहे (नात)
चि. आरिव अनिल नेहे (नातु)
श्री. यादव तुकाराम नेहे (भाऊ)
श्री. लहानु तुकाराम नेहे (भाऊ)
श्री. दिनकर कुशाबा नेहे (पुतणे)
श्री. एननाथ पंढरीनाथ नेहे (पुतणे)
श्री. अशोक पंढरीनाथ नेहे (पुतणे)
श्री. कैलास पंढरीनाथ नेहे (पुतणे)
श्री. विलास पंढरीनाथ नेहे (पुतणे)
श्री. संजय पंढरीनाथ नेहे (पुतणे)
श्री. सुभाष रामनाथ नेहे (पुतणे)
श्री. राजाराम रामनाथ नेहे (पुतणे)
श्री. बाळासाहेब यादव नेहे (पुतणे)

गं.भा. गिताबाई माधव नेहे (भावजई)
सौ. योगिता अनिल नेहे (सून)
सौ. वर्षा प्रविण नेहे (सून)
कु. नित्या प्रविण नेहे (नात)
श्री. सोमनाथ कुशाबा नेहे (पुतणे)
सौ. जनाबाई यादव नेहे (भावजई)
सौ. हौशाबाई लहानू नेहे (भावजई)
सौ. रतन किसन नलावडे (पुतणी)
सौ. मंदा दत्तात्रय जोंधळे (पुतणी)
सौ. संगीता संभाजी मगर (पुतणी)
सौ. सुनिता रामनाथ शिंदे (पुतणी)
श्री. मच्छिंद्र माधव नेहे (पुतणे)
श्री. सुरेश माधव नेहे (पुतणे)
श्री. गणेश माधव नेहे (पुतणे)
श्री. रावसाहेब लहानु नेहे (पुतणे)
श्री. सुभाष सखाराम फटांगरे (भाचे)

**समस्त नेहे परिवार, आप्तेष्ठ व ग्रामस्थ सावरगांव तळ**

- प्रवचनकार -
ह.भ.प. सचिन महाराज गायकवाड
(आश्विकर) यांचा प्रवचनाचा कार्यक्रम होईल.



# जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता

## सतर्कता बाळगण्याचे प्रशासनाचे आवाहन




अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यात १७ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी १८ व १९ मार्च रोजी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, कोणत्याही प्रकारची जीवितहानी व वित्तहानी टाळण्यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेची पुरेशी काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

वीज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना, नागरिकांनी झाडांखाली, मोकळ्या मैदानात, विजेचे खांब व लोखंडी कुंपणाजवळ उभे राहू नये. वीज कोसळण्याची शक्यता असल्याने, या काळात विजेच्या उपकरणांचा वापर टाळावा व ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे यांसारख्या सुवाहक वस्तूंपासून दूर राहावे.

घराबाहेर मोकळ्या जागेत अडकल्यास, गुडघ्यांवर बसून कान व डोके झाकून सुरक्षिततेची काळजी घ्यावी.

जाहिरात फलक कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने, त्याजवळ थांबणे टाळावे. धरणे, नद्या व कालव्यांच्या परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहात उतरू नये व धोकादायक ठिकाणी फोटो काढणे टाळावे. शेतकऱ्यांनी वादळी वारा व पावसापासून शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे, तसेच काढणीस आलेला शेतमाल व जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत.

आपत्कालीन परिस्थितीत, नागरिकांनी नजीकचे पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या १०७७ या टोल फ्री क्रमांकावर व ०२४१ - २३२३८४४ या दूरध्वनीवर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. गिते यांनी केले आहे.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर...................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# लोकप्रतिनिधींची बदनामी करणाऱ्या दिनेश फटांगरेला मारहाण, गुन्हाही दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात सोशल मीडियावरील वादग्रस्त पोस्टमुळे राजकीय वातावरण तापले असून या प्रकरणी दिनेश भिमाशंकर फटांगरे याला शहर पोलिस ठाण्यातच चोप देण्यात आला तसेच त्याच्या विरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घुलेवाडी येथील विजय ज्ञानेश्वर पवार यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, दिनांक १७ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास फेसबुक पाहत असताना त्यांना आ. सत्यजित तांबे (नाशिक पदवीधर मतदार संघ) यांच्याविरोधात दिनेश फटांगरे याने १६ व १७ मार्च रोजी आक्षेपार्ह व अश्लील भाषेतील पोस्ट केल्याचे निदर्शनास आले. संबंधित पोस्टमध्ये अपमानास्पद शब्दांचा वापर करून आमदारांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा तसेच समाजात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारच्या पोस्टमुळे दोन गटांमध्ये द्वेष निर्माण होऊन गंभीर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच आमदारांच्या लौकिकास बाधा आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी दिनेश फटांगरे, रा. शिवाजीनगर, संगमनेर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३५२, ३५३(२), ३५६(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वीही दिनेश फटांगरे याने राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार व त्यांच्या चालकाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप असून, त्या प्रकरणी त्यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला होता.

मंगळवारी आ. सत्यजित तांबे यांच्याविषयी पुन्हा अपशब्द वापरल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी फटांगरे यांना शोधून पोलिस ठाण्यात आणले. यावेळी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संतापाच्या भरात फटांगरे याला चांगला चोप दिला.

वारंवार फेसबुकवरून लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित लोकांची बदनामी करून वातावरणात दूषित करणाऱ्या दिनेश फटांगरे याच्या विरोधात संगमनेरमध्ये संताप निर्माण झाला आहे. पोलीस पुढील तपास करत आहे.

# तीन दिवस 'मंथन' व्याख्यानमाला!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मालपाणी उद्योग समूहाचे अध्वर्यू स्वर्गीय माधवलालजी मालपाणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १९ मार्च ते २१ मार्च अशी तीन दिवसीय 'मंथन व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आल्याची माहिती राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

गुरुवारी १९ मार्च रोजी सुप्रसिद्ध लेखक अर्थतज्ज्ञ आणि प्रेरणादायी व्याख्याते चंद्रशेखर टिळक यांचे 'जागतिक राजकारण, भारतीय अर्थकारण' या विषयावर व्याख्यान होणार आहे. शुक्रवारी २० मार्च रोजी माजी भारतीय प्रशासकीय अधिकारी, सुप्रसिद्ध लेखक आणि प्रेरणादायी व्याख्याते व चाणक्य मंडलचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांचे 'विकसित भारतासाठीची शिक्षणपद्धती' या विषयावर तर, शनिवारी २१ मार्च रोजी 'विकसित भारत आणि आपण सगळेच' या विषयावर व्याख्यान होणार असल्याने संगमनेरकरांनी ही पर्वणी सोडू नये असे आवाहन मंडळाचे कार्याध्यक्ष सुमित अट्टल, सागर मणियार, कल्पेश मर्दा, प्रतिक पोफळे, कृष्णा आसावा, सहखजिनदार वेणुगोपाल कलंत्री यांनी केले आहे.

# स्थगित नाशिक-पुणे रेल्वेच्या फेर सर्वेक्षणासाठी रेल्वे मंत्र्यांकडे मागणी करणार - आ. खताळ



नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पासंदर्भातील सद्य:स्थिती विचारात घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची लवकरच भेट घेणार आहे. स्थगिती दिलेल्या प्रस्तावित नाशिक-पुणे रेल्वे मार्गाच्या फेर सर्वेक्षणाची विनंती यानिमित्ताने त्यांच्याकडे करणार असून यावर केंद्रीय रेल्वे मंत्री सकारात्मक निर्णय घेतील अशी ठाम अपेक्षा आहे.

– आमदार अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पासंदर्भात मुंबई येथे रेल निर्माणचे चीफ इंजिनियर ब्रिजेश कुमार सिंग यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुचनेनुसार झालेल्या या बैठकीत प्रस्तावित रेल्वे मार्ग, अंतिम सर्व्हे तसेच प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला असून लवकरच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ यासंदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन स्थगित रेल्वे मार्गाच्या फेर सर्वेक्षणाची मागणी करणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

संगमनेर व परिसरातील नागरिकांच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याने स्थानिक जनभावना लक्षात घेऊन मार्गातील अडचणी आणि तांत्रिक अडथळ्यांबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. यापुर्वी झालेले सर्वे त्यानुसार येत असलेले अडथळे आणि त्यावरील पर्याय यासंदर्भात रेल निर्माण विभागातील संबंधित अधिकारी यांच्याकडून आढावा यावेळी घेण्यात आला असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

दरम्यान आमदार खताळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, संगमनेरच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या रेल्वे प्रकल्पासंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला असून राज्य सरकारने याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळण अधिक वेगवान होणार असून औद्योगिक आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

विशेषत: GMRT संदर्भातील अडथळा दूर करण्यासाठी पुढील स्तरावर पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बैठकीत ठरविण्यात आले. या प्रकल्पामुळे नाशिक, संगमनेर आणि पुणे परिसरातील प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होणार असून शेती, व्यापार, उद्योग आणि पर्यटन क्षेत्रालाही मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी बैठकीसाठी विकास क्रांती सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# संगमनेरच्या रस्ते विकासासाठी ५० लाखांचा निधी - सौ. सूर्यवंशी



## आ. अमोल खताळांचा पाठपुरावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील महायुती सरकारच्या वतीने तसेच आ.अमोल खताळ यांच्या पाठपुराव्याने संगमनेर शहरातील रस्ते विकासासाठी रस्ते अनुदान योजनेतून सुमारे ५०लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहीती शिवसेनेच्या नगरसेविका सौ.साक्षी सुर्यवंशी यांनी दिली.

महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार जिल्ह्याचे पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महानगरपालिका तसेच नगरपालिकांना द्यावयाच्या मोटार वाहन कराच्या अभिहस्तांकित रकमा रस्ता अनुदान १५७.६०कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.यामध्ये संगमनेर शहरातील रस्त्याकरीता निधी मिळावा म्हणून आ.अमोल खताळ यांनी शासनाकडे पाठपुरवा केला होता.त्यामुळे ५०लाख रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याचे नगरसेविका साक्षी सूर्यवंशी म्हणाल्या. शासन निर्णयानूसार वितरीत करण्यात येत असलेल्या सर्व निधीचे नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्या मार्फत केले जाणार आहे.सर्व रस्त्यांची काम सार्वजनिक ठिकाणीच करण्यात येणार असून,यामुळे नागरीकांच्या प्राथमिक सुविधांची काम करता येतील.

शहराच्या विकासासाठी आ.अमोल खताळ यांनी सातत्याने विविध योजनांच्या माध्यमातून निधीची उपलब्धता करून दिली आहे.भविष्यात शहराच्या सर्वागीण विकासासाठी महायुती कटीबध्द राहून काम करणार असल्याचे साक्षी सुर्यवंशी यांनी सांगितले.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सोनेरी पहाट उंच गुढीचा थाट आनंदाची उधळण अन सुखांची बरसात दिवस सोनेरी नव्या वर्षाची सुरुवात..!
गुढी पाडवा निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25